शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

राज्यशासनाची दक्षिणा शिष्यवृत्तीचे सन २०१९-२० साठी mahadbt portal वर ऑनलाईन अर्ज सादर करणेबाबतचे डॉ. विजय नारखेडे, शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे क्र उशिसं-२०१९/दक्षिणा शिष्यवृत्ती योजना/परिपत्रक/११७८४ दिनांक १३/०९/२०१९ रोजीचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही. एस. सोयम)
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ परीपत्रक नं - ३९९
दि. 19 SEP 2019

d:\2019\mangutkar\circular.docx

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

web: www.dhepune.gov.in
E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९
फॅक्स ०२०/२६११११५३

क्र.उशिसं-२०१९/दक्षिणा शिष्यवृत्ती योजना/परिपत्रक/ 11784
दिनांक-१३/०९/२०१९
13 SEP 2019

प्रति,
प्राचार्य/संचालक/कुलसचिव,
यादीतील सर्व महाविद्यालये/संस्था/विद्यापीठे.

विषय:- राज्यशासनाची दक्षिणा शिष्यवृत्तीचे सन २०१९-२० साठी mahadbt portal वर ऑनलाईन अर्ज सादर करणेबाबत.

संदर्भ:- १. शासन निर्णय शिक्षण व सेवायोजना क्र.एससीएच-१०६५-यु. दि. १९/०९/१९६५.
२. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं-२०१८/दक्षिणा शिष्यवृत्ती योजना/१९५८०/ दिनांक-०४/१२/२०१८.
३. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं-२०१८/दक्षिणा शिष्यवृत्ती योजना/परिपत्रक / २००२१/दि.१३/१२/२०१८.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, राज्यातील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण घेता यावे या हेतूने शासनाने संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये दक्षिणा शिष्यवृत्ती सुरु करण्यात आलेली आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी महाविद्यालय स्तरासाठी ५४ व विद्यापीठ स्तरावर २२ असे एकूण ७६ संच निर्धारीत केलेले आहेत. ते पुढीलप्रमाणे

महाविद्यालयीन स्तर

| | |
|---|---|
| १. एलफिन्स्टन महाविद्यालय,मुंबई | ०६ |
| २. शासकीय विज्ञान संस्था,मुंबई | ०६ |
| ३. ईस्माईल युसुफ महाविद्यालय,मुंबई | ०४ |
| ४. सिडनहॅम महाविद्यालय,मुंबई | ०४ |
| ५. शासकीय विधी महाविद्याल,मुंबई | ०४ |
| ६. राजाराम महाविद्यालय,कोल्हापूर | ०६ |
| ७. शासकीय विज्ञान संस्था,नागपूर | ०६ |
| ८. शासकीय विज्ञान ज्ञान विज्ञान महाविद्यालय,औरंगाबाद | ०६ |
| ९. शासकीय ज्ञान विज्ञान संस्था,अमरावती | ०६ |
| १०. वसंतराव नाईक महाविद्यालय,नागपूर | ०६ |
| एकूण- | ५४ |

विद्यापीठ स्तर

| | |
|---|---|
| १. मुंबई विद्यापीठ,मुंबई | ०४ |
| २. पुणे विद्यापीठ,पुणे | ०४ |
| ३. नागपूर विद्यापीठ,नागपूर | ०४ |
| ४. डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद | ०४ |
| ५. एस एन डि टी विद्यापीठ,मुंबई | ०२ |
| ६. शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर | ०४ |
| | एकूण- २२ |

आपल्या महाविद्यालय/संस्था/विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी राज्यशासनाची दक्षिणा शिष्यवृत्तीचे सन २०१९-२० साठी ऑन- लाईन अर्ज सादर करावयाचे आहेत. मात्र या शिष्यवृत्तीसाठी अद्यापर्यंत एकही अर्ज प्राप्त झालेला नाही. त्यामुळे आपण सदर योजनेची प्रसिध्दी करुन सर्व विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती आपल्या स्तरावरुन देण्यात यावी.

तसेच सन २०१८-१९ यावर्षी सदर योजनेसाठी शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या विद्यार्थ्यांना सन २०१९-२० साठी नुतनीकरणाचा अर्ज mahadbt portal वर online भरणेबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच सन २०१९-२० मध्ये नवीन अर्ज सादर करण्यासाठी विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीची माहिती देऊन mahadbt portal वर online अर्ज भरण्यासाठी प्रोत्साहीत करावे. सदर शिष्यवृत्ती योजनेसाठी आपल्या महाविद्यालयाकडून या शिष्यवृत्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रसिध्दी करावी.

सदर योजनेसाठी पात्र असलेला विद्यार्थी या शिष्यवृत्ती योजनेपासून वंचीत राहू नये याची दक्षता घेण्यात यावी.

(डॉ. विजय नारखेडे)
शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत: सर्व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण विभाग,
/-आपल्या विभागातील उपरोक्त महाविद्यालये, विद्यापीठे यांच्याकडे आपल्या स्तरावरुन पाठपुरावा करावा.